सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचना क्र.विनोंका २००१/प्र.क्र.३६२/कु.क.३, दि.२३/३/२००२ महाराष्ट्र शासन राजपत्र दि.४ एप्रिल २००२ भाग ४ (अ) पृष्ठ क्र.५८२ वर प्रसिध्द करण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये खालीलप्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

भाग चार - अ ) महाराष्ट्र शासन राजपत्र, एप्रिल ४, २००२/ चैत्र १४,शके १९२४

सार्वजनिक आरोग्य विभाग

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दि.२३ मार्च २००२

## अधिसूचना

**विशेष विवाह अधिनियम, १९५४ :-**

क्रमांक.विनोंका.२००१/प्र.क्र.३६२/कु.क.३. — विशेष विवाह कायदा, १९५४ (१९५४ चा (XLIII) कलम ५० चे उपकलम ( २ ) या खंड ( ड ) चा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र विशेष विवाह नियम, १९६४ मधील नियम २० मधील उक्त कामांतर्गत विवाह विधी संपन्न करण्याकरिता व इतर कलमांकरिता आकारण्यात येणारे शुल्काचे सुधारित दर दिनांक ५ एप्रिल २००२ पासून आकारण्यास मान्यता देत आहे आणि सदर सुधारित दर खालीलप्रमाणे असतील.

| अ.क्र | वर्णन | प्रस्तावित केलेली फी रुपये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | कलम ६ नुसार नोटीस देणे व ती प्रसिध्द करणे. | ५०/- |
| २. | कलम ६ (३) नुसार नोटिसीच्या जादा प्रति, प्रत्येक प्रतिसाठी. | ५०/- |
| ३. | कलम १५ नुसारच्या अर्जाबाबत. | १००/- |
| ४. | कलम ७ किंवा १६ खाली प्राप्त झालेल्या नोंदी व हरकती | २५/- |
| ५. | विवाह निबंधकाचे कार्यालयामध्ये विवाह विधी संपन्न करणेसाठी | १५०/- |
| ६. | विवाह निबंधकाचे कार्यालयाव्यतिरिक्त खाजगी ठिकाणी विवाह विधी संपन्न करावयाचा असल्यास | १०००/ |
| ७. | कलम १५ अन्वये दिलेला अर्ज किंवा विवाह दाखल्याची प्रमाणित प्रत व घोषणापत्राची प्रत. | २५/- |
| ८. | विवाह निबंधकाच्या कार्यालयातील अभिलेखावरुन (नोटीस पुस्तकाव्यतिरिक्त) शोध घेण्यासाठी कलम ५ नुसार केलेला अर्ज. | ५/- |

..2/-

| १ | २ | ३ |
|---|---|---|
| ९. | शोध शुल्क :-<br>अ) प्रथम वर्षाला | ५/- |
| | ब) पुढील प्रत्येक वर्षाला जास्तीत जास्त<br>२५/- रु. | ५/- |
| | | ५०/- |
| १०. | आयोग नेमण्याबाबत. | ५/- |
| ११. | हुकूमनाम्याची प्रत किंवा कलम ६(३) अन्वये विवाह विच्छेदनाची प्रत दाखल करणेसाठी. | ५/ |
| १२. | वरील बाबी वगळता या कायद्याखाली कोणत्याही अर्जासाठी. | |

सदर शुल्क लेखाशिर्ष " ००३० - मुद्रांक व नोंदणी शुल्क " या खाली शासनाकडे जमा करण्यांत येईल. जर विवाह, विवाह अधिकाऱ्यांच्या कार्यालयाव्यतिरिक्त अन्य जागी संपन्न अथवा नोंदणी करण्यांत आला असेल तर मिळालेल्या शुल्कापैकी रुपये १००/- शासनास जमा करण्यांत यावेत व उर्वरित रक्कम विवाह अधिकाऱ्यांने त्याची वेतनेत्तर प्राप्ती म्हणून ठेवावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने..........

( सं.चं.गोंडकर )
शासनाचे अवर सचिव